दि. २२/०५/२०२३

# प्रसिध्दी पत्रक

आरोपी लोकसेवक - विनोद मोतीराम पंडित, वय 36 वर्षे, पद- रचना सहाय्यक (वर्ग-2), नेमणुक- विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख रुपये 50000/- रक्कम स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिटीचौक औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | विनोद मोतीराम पंडित, वय 36 वर्षे, पद- रचना सहाय्यक (वर्ग-2), नेमणुक- विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग महानगरपालिका औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 2,00,000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 50000/- रुपये (अॅडव्हान्स) |
| तपास अधिकारी | :- | श्री. नंदकिशोर क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांची वडीलोपार्जित जमीन रस्ताविस्तारिकरणामध्ये म.न.पा. अतिक्रमण विभाग, औरंगाबाद यांनी ताब्यात घेतल्याने त्या विरुध्द तक्रारदार यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रीट दाखल केली. मा. न्यायालयाने तक्रारदार यांचे बाजुने निकाल दिला. सदर फाईलवर लवकर कारवाई करणे व मोबदला स्वरुपात जमिनीच्या मुल्यांकन पेक्षा जास्त रक्कमेचा मोबदला मिळवून देण्याकरिता. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांची वडीलोपार्जित जमीन रस्ताविस्तारिकरणामध्ये म.न.पा. अतिक्रमण विभाग, औरंगाबाद यांनी ताब्यात घेतल्याने त्या विरुध्द तक्रारदार यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रीट दाखल केली होती. त्या रीटवर मा. उच्च न्यायालय यांनी तक्रारदार यांच्या बाजुने निकाल देऊन जमिनीचा मोबदला देण्याचे महानगरपालिका औरंगाबाद यांना आदेश दिलेले आहेत. सदरची फाईल विशेष भूसंपादन अधिकारी कार्यालय, महानगरपालिका औरंगाबाद यांच्याकडे पुढील कारवाईसाठी प्राप्त झाली असता यातील आ. लो. से. श्री. विनोद पंडित यांनी तक्रारदार यांच्या फाईलवर लवकर कारवाई करणे व मोबदला स्वरुपात जमिनीच्या मुल्यांकन पेक्षा जास्त रक्कमेचा मोबदला मिळवून देण्याकरिता 2,00,000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 22/05/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. विनोद पंडित यांनी 50,000/- रुपये (अॅडव्हान्स) पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार श्रीमती गुरमीत कौर अरजीत सिंग टक्कर, रा. आनंदनगर पडेगाव औरंगाबाद यांना लाचेची मागणी करुन रक्कम रुपये 50,000/- (अॅडव्हान्स) भडकलगेट जवळ रोडवर स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे सिटीचौक औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नंदकिशोर क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो. अं. अशोक नागरगोजे, रविंद्र काळे, विलास चव्हाण, कपील गाडेकर, चालक-चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार अॅप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.